Gen25-26

**सोलापूर महानगरपालिका,सोलापूर.**
**पत्ता- इंद्रभुवन, पुण्यश्लोक आप्पासाहेब वारद पथ, रेल्वेलाईन्स, सोलापूर ४१३००१**
**मंडई विभाग**

---

## जाहीरप्रसिद्धीकरणाचा मसुदा

सोलापूर शहरातील लक्ष्मी मार्केट येथे उपलब्ध असलेल्या मनपा मालकीचे दोन खुल्या जागेचे पार्किंग (पे ॲण्ड पार्क) करिता भाडे तत्वावर चालविणे या कामाचे सविस्तर माहिती ( शर्ती व अटीसह ) दि.१४/१०/२०२५ पासून मनपाचे अधिकृत संकेतस्थळ www.solapurcorporation.com या संकेतस्थळावर पाहण्यास उपलब्ध आहे. तसेच याबबतची अधिक माहिती करिता सोलापूर महानगरपालिके कडील मंडई विभाग / कार्यालयकडे संपर्क साधावा.

संपर्क : १) मल्लिनाथ तोडकर (मंडई अधीक्षक) – ९८६०००२०१०

२) चेतन प्रचंडे (कनिष्ठ अभियंता) – ९६६५३२८७०४ / ७०२०३०२९१२

13/10

(तपन डंके)
नियंत्रण अधिकारी – १
मंडई विभाग
सोलापूर महानगरपालिका, सोलापूर

# सोलापुर महानगरपालिका,सोलापुर.
## मंडई विभाग
## जाहिर लिलाव सुचना

सोलापुर महानगरपालिका हद्दीतील महानगरपालिका मालकीचे लक्ष्मी मार्केट येथील खुल्या जागेचे पे अँन्ड पार्क करणेसाठी ११ महिनेकरिता भाडे तत्वावर देणेकामी ऑफलाईन -ऑक्शन आयोजित केले असुन इच्छुक ऑफलाईन ऑक्शन सहभागाकरिता जाहीर लिलाव सूचना प्रसिद्ध करणेत येत आहे. इच्छुक लिलावाचे सहभागाकरिता तपशील खालील प्रमाणे आहे. सदर ऑक्शनची सविस्तर माहिती (www.solapurcorporation.com) या संकेत स्थळावर दिनांक १४/१०/२०२५ पासून उपलब्ध करुन देणेत येत आहे व याबाबतची सविस्तर माहिती मंडई विभाग कडून घ्यावी.
अर्ज सादर करणेचा अंतिम दि. २४/१०/२०२५ नंतर कोणतेही अर्ज स्वीकारले जाणार नाही.

| अ.क्र. | जागेचे तपशील | मुदत | रक्कम रुपये (फॉर्म फी) | क्षेत्रफळ (चौ.मी) | किमान अपेक्षित भाडे र.रु (प्रति महा) |
|---|---|---|---|---|---|
| १. | लक्ष्मी मार्केट येथील मनपा मालकीचे ०२ खुल्या जागा | ११ महिने | १०००.०० | ९९२.०० | ८,२७८.०० |

सदर ई निविदा बाबत काही शंका किंवा अडचणी असल्यास ९६६५३२८७०४ / ७०२०३०२९१२ या नंबरवर संपर्क साधावा.सदर ई निविदा ही ऑफलाईन पध्दतीने भरावयाची असुन बयाणा रक्कम निविदा अर्ज सादर करतेवेळी मंडई विभाग येथे ऑफलाईन पध्दतीने भरावयाची आहे.

सुचना - १) सोबत जोडलेल्या शर्ती व अटी निविदा धारकांना बंधनकारक राहतील.
२) निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार मा.आयुक्त सो.म.पा. यांचेकडे राखून ठेवले आहेत.

नियंत्रण अधिकारी -०१
मंडई विभाग
सोलापूर महानगरपालिका

Digitally signed by
Danke Tapan Dilip
Date: 10-10-2025
10:54:34

## सोलापुर महानगरपालिका,सोलापुर.
## मंडई विभाग
## जाहिर लिलावाचे निविदा शर्ती व अटी

१ . सोलापूर महानगरपालिकेच्या वरील मिळकतींना ११ महिन्यांच्या कालावधीसाठी प्रायोगिक तत्वावर लिलाव पध्दतीने विनीयोग करणेकरीता जास्तीत जास्त लिलावाची रक्कम देवू करणा-या व्यक्ती कडून जाहीर निविदा मागविणेत येत आहे. एकापेक्षा अधिक निविदा धारांनी प्रस्तावित केलेले दर समान असल्यास चिठ्ठी टाकून निर्णय घेण्यात येईल.

२. निविदा भरतेवेळीच निविधारक यांनी आधारकार्ड,पॅन कार्ड व बँक पासबुक अर्जासोबत जोडणे बंधनकारक आहे.

३. यशस्वी ठेकेदारास त्याने निविदा संचयामध्ये नमुद केलेल्या निविदा रक्कमेनुसार देय रक्कम (अनामत रक्कमे बरोबर) त्वरीत आगाऊ रक्कम भरावी लागेल आणि त्याचबरोबर आयकर व वस्तू आणि सेवाकर भरणे बंधनकारक राहील तसेच जागा वापराबाबतची लायसन्स फी रक्कम दरवर्षी ठेका सुरु होण्याच्या १ महिना अगोदर सोलापूर मनपा कडे भरणे बंधनकारक आहे. त्यासाठी सदरची रक्कम NACH पध्दतीने स्विकारण्यात येणार असून, त्याची कागदपत्रे मिळकतीचा ताबा घेण्यापूर्वी यशस्वी ठेकेदाराने कार्यालयात देणे अनिवार्य राहील.

४. निविदा धारकाचे कुटुंबीय सोलापूर महानगरपालिकेमध्ये असल्यास / नसल्यास निविदा सादर करताना या संदर्भातील माहितीचे निविदा सोबत विहित नमुन्यातील प्रतिज्ञापत्र (रु.१०० च्या किमतीच्या स्टॅम्प पेपरवर नोटराईज्ड केलेले) सादर करणे बंधनकारक राहील, तसेच अशा माहिती मध्ये कुटुंबीय व्यक्तीचे नाव, हुददा, निविदाधारकाशी नाते इत्यादी तपशील स्पष्ट नमुद करण्यात यावा.

५. बयाना रक्कम विनापरतावा असणार आहे.

६. सोलापूर मनपाच्या संकेत स्थळावर उपलब्ध असलेल्या सुधारीत निविदा कार्यप्रणाली बाबतचे अटी व शर्ती प्रस्तुतच्या निविदेस लागू राहतील.

७. पात्र निविदादारास उक्त मिळकत देणे याबतचे प्रस्तावास मिळालेल्या प्रशासकीय मान्यते बाबत निविदा दारास कळविलेच्या दिनांकापासून संबंधित निविदादाराने पंधरा दिवसांच्या आत भाडे रक्कमे इतकी रक्कम अनामत म्हणून भरावी लागेल. तसेच त्यापुढील सात दिवसांत करारनामा करणे बंधनकारक राहील, तसेच भरलेल्या भाडे अनामत रक्कमेवर निविदादारास व्याज मागण्याचा अधिकार राहणार नाही.

८. जागा वापराच्या करारनाम्याची मुदत ६ महिने कालावधीची राहील. कामाची निकड या तत्कालीन परिस्थिती पाहता कामास मुदतवाढ देण्याचे अधिकार आयुक्तांना राहतील. त्याबाबत करावयाच्या करारनामाच्या स्टॅम्प पेपरवर, रजिस्ट्रेशन व मसुदा को इत्यादी तदअनुर्यागिक बाबीचा खर्च हा निविदादाराने करावयाचा आहे.

९. पार्किंग शुल्क वसुली पावत्यांची छपाई करण्यात यावी. ज्यामध्ये वाहनांचा वेळ व वाहनांचा क्रमांक देण्यात यावे. त्याच पावत्या वापरणे ठेकेदारावर बंधनकारक राहील. तसेच पायतीवर ठेकेदाराचे नाव फोन क्रमांक व नागरीकांना तक्रार करता येईल दृष्टीने सोलापूर महानगरपालिकेच्या संबंधित अधिका-यांचा तपशिल पावत्यावर देणे बंधनकारक राहील. सदर पावतीचा छपाई खर्च ठेकेदाराने करावयाचा आहे.

१०. सदर ठिकाणचे वाहनतळ आठवडयाचे सातही दिवस चालू ठेवणे बंधनकारक राहील. पार्किंग वेळेमध्ये बदल करण्याचा अधिकार नियंत्रक अधिकारी यांना राहील व त्या ठिकाणी ठेकेदाराने स्वतःचे कर्मचारी ठेवले पाहिजे,

११. पारदर्शकता आणि सुलभतेसाठी पार्किंगच्या ठिकाणी एकुण किती वाहनांकरीता जागेची उपलब्धता आहे त्याचा तपशिल फलकावर लावणे बंधनकारक राहील.

१२. ठेकेदाराने १८ वर्ष वयापेक्षा कमी वयाचे कर्मचारी नेमू नयेत. सदर वाहनतळावर ठेकेदाराने ठेवलेल्या कर्मचा-यांची नाचे य त्याचे पूर्ण पत्ते याची फोटोसह यादी त्यांना कामावर ठेवण्यापूर्वी ठेकेदाराने स्वतःकडे ठेवणे आवश्यक असून, सोलापूर महानगरपालिकेने मागणी केल्यास त्वरीत सादर करणे बंधनकारक राहील.

१३. ठेकेदाराने कामावर ठेवलेल्या कर्मचा-यांकडे पार्किंग शुल्क वसुल करताना आयकार्ड जवळ असणे आवश्यक आहे.

१४. ठेकेदाराने व सदर वाहनतळावर काम करणा-या कर्मचा-यांनी सदर ठिकाणी नागरीकांशी सौजन्याने व नम्रतेने वागावे, त्यांचेशी गैरवर्तन करता कामा नये.

१५. पार्किंगसाठी येणा-या निरनिराळया वाहनांवर प्रत्येकवेळी फी वसुलीचे दर पुढील प्रमाणे राहतील.

दुचाकी वाहने - प्रती दोन तासांकरीता र.रु.१०/-

चारचाकी वाहने - प्रती दोन तासांकरीता र.रु.२०/-

पार्किंगच्या जागेचा वापर मुळ हेतु व्यतिरिक्त ५० % जागा व्यावसायिक दृष्टीने वापर करणे मंजूर आहे.या व्यतिरिक्त जागेचा गैरवापर होत असल्याचे आढळून आल्यास किवा करारनाम्यातील अटी व शर्तीचा भंग करुन ज्यादा दराने शुल्क वसूल केल्याचे निदर्शनास आल्यास प्रथमःहा लेखी समज देवून मासिक मक्ता रक्कमेच्या ५०% इतका दंड आकारण्यात येईल, दुस-यांदा भंग केल्यास पुन्हा लेखी समज देवून मासिक रक्कमेच्या १००% इतका दंड आकारण्यात येईल व त्यानंतर सुध्दा करारनाम्यातील अटी व शर्ती भंग केल्यास सुरक्षित रक्कम जप्त करुन सफ्ता रदद करुन संबंधित निविदा धारकाचे नाव काळया यादीत टाकणेत येईल.

१६, सरकारी, निमसरकारी शासकीय वाहन या शासकीय मालमत्तेच्या वाहनांकडून तसेच ज्या वाहनांवर सोलापूर मनपाचे पार्किंगचे स्टॉकर्स आहेत अशा वाहनांकडून (Pay & Parking) चे भाडे घेवू नये परंतु शासकीय संस्थेने भाडे तत्वावर घेतलेल्या वाहनांकडून (Pay & Parking) च्या नियमानुसार पार्किंगची फी घ्यावी.

१७. कोणतेही वाहन पार्किंगच्या जागेवरुन हरवल्यास, बदल्यास, चोरीला गेल्यास अगर त्याची मोडतोड झाल्यास यायावत पोलिसांकडे तक्रार करणे व विमा कंपनीस आवश्यक असलेल्या कागदपत्राबाबतची पूर्तता करणेस ठेकेदाराने संबंधित वाहनचालकांस सहकार्य करणे आवश्यक आहे.

१८. सोलापूर महानगरपालिकेने सुचविलेल्या नुसार वाहने पार्किंग करणेच्या जागेवर पार्किंग पटटे रंगविणे व सुस्पष्ठ ठेवण्याची जवाबदारी ठेकेदारावर राहील. त्यात्या वाहनांसाठी नेमून दिलेल्या जागेव्यतिरिक्त अन्य जागी वाहने उभी केली जाणार नाही व अन्यत्र कोणी वाहने उभी केल्यास दूर होत असल्यास तरीही त्याग हरकत घेणे व वाहने नेमून दिलेल्या जागेत आणून या जबाबदारी ठेकेदार वर राहील.

१९. ठेकेदाराने पार्किंगचे दरपत्रक शर्ती अटी दर्शविणारे फलक ज्या ज्या ठिकाणी पार्किंग फी वसूल केली जाते त्या त्या ठिकाणी व सवंधित अधिकारी सुचवतील त्या ठिकाणी सहजपणे सर्वांना दिसतील व वाचता येतील असे ठ ळक अक्षरातील फलक लावणे बंधनकारक आहे. सदर फलक न लावल्याबाबत तक्रार आल्यास व शहानिशा अंती सिध्द झाल्यास आपला ठेका रदद करण्यात यईल.

२०. कोणतीही वाहने, विशिष्ट स्टॅन्ड, ठेकेदारास अन्य कोणासही पोट भाडयाने देता येणार नाही. अशा प्रकारचे दिल्याचे आढळून आल्यास ठेका त्वरीत रदद करणेचा अधिकार मा. आयुक्त मनपा यांना राहील.

२१. कोणत्याही कारणास्तव मक्त्याच्या मुदतीत मक्ता रदद करणेचा अगर मक्तेदारास फी वसूल न करण्यास सांगण्याचा अधिकार खाते प्रमुख यांना राहील. त्यावायत कोणतीही तक्रार करता येणार नाही. अगर नुकसान भरपाई मागता येणार नाही.

२२. (Pay & Parking) च्या योजनेच्या ठेकेदाराने या व्यवसायाच्या अनुषंगाने जे कोणते शासकीय कार असतील ते शासनाच्या संबंधित खात्याकडे भरण्याची जबाबदारी ठेकेदाराची राहील. या संदर्भात कोणताही वाद निर्माण झाल्यास त्याचे निराकरण ठेकेदाराने स्वतः संबंधित शासन विभागाकडून करून घेणे आवश्यक आहे.

२३. सरकारी हुकुम, नेसर्गिक आपत्ती अथवा अन्य काही अपरीहार्य कारणांमुळे वाहनतळ बंद राहील्यास अगर बंद ठेवणेस सांगावं लागल्यास त्यामुळे ठेकेदारास नुकसान भरपाई मिळणार नाही.

२४. नमुद केलेल्या अटी शर्तीचा भंग केल्यास मक्ता रदद करण्याचा तसेच अनामत रक्कम जप्त करणेचा अधिकार मा. आयुक्त मनपा यांना राहील.

२५. वाहनतळासाठी जी विदयुत व्यवस्था मनपा मार्फत करण्यात आलेली आहे त्याची सर्व बिले ठेकेदाराने भरावयाचे आहे.

२६. वाहनतळामध्ये दैनंदिन स्वच्छता व साफसफाई ठेकेदाराने स्वखर्चाने करावयाची आहे.

२७. सदरील मिळकतीचे वेळोवेळी तपासणी करण्याचे अधिकार महानगरपालिकेल्या अधिका-यांना राहतील व अशा प्रसंगी त्यांना कोणत्याही प्रकारचा अडथळा करता येणार नाही.

२८. निश्चित झालेल्या निविदाधारकाने लिलाव निश्चित झालेनंतर नियंत्रण अधिकारी – मंडई विभाग यांचेशी करारपत्र करतेवेळी सुरक्षित रक्कम म्हणून रक्कम रुपये २०,०००/- भरावयाचे आहे.

२९. निविदादारास जेवढ्या मिळकतीचा ताबा मोजमाप करुन देण्यात येईल तेवढ्याच जागेचा वापर करता येईल अतिरिक्त जागा वापरता येणार नाही. तसेच मिळकतीमध्ये कोणत्याही अंतर्गत बदल मनपाचे पुर्वपरवानगी शिवाय करता येणार नाही.

३०. निविदाराने मिळकतीची पाहणी करुनच निविदा भरावी यशस्वी ठेकेदारास मिळकतीचा ताबा हा आहे त्या स्थितीत देण्यात येईल.

३१. उपरोक्त सर्व अटी व शर्ती या निविदादार यांचेवर बंधनकारक आहेत व राहतील या सर्व अटी व शर्ती पुर्णपणे समजावून घेवूनच निविदाधारकाने आपली निविदा भरावी.

३२. सदर मिळकतीमध्ये काही अनुचित घटना घडल्यास अथवा दुर्घटना घडल्यास त्याची जबाबदारी निविदाधारकावर राहील.

३३. संधित निविदादार / संस्था यांच्याकडे मालमत्ता व व्यवस्थापन विभागाकडील थकबाकी असल्यास थकबाकी भरल्यानतरच निविदा प्रक्रियेमध्ये भाग घेता येईल,

३४. यशस्वी निविदादार/ संस्था यांनी संबंधित ठेका मिळाल्यानंतर शेरा रजिस्टर / तपासणी रजिस्टर अंदयावत ठेवणे आवश्यक राहील.

३५, निविदा अटी व शर्तीचे पालन करणे बंधनकारक राहीन उन्लघंन झाल्यास त्यातून निर्माण होणा-या न्यायालयीन वादास संपूर्णतः संबंधी निविदाधारक जबाबदार राहील.

३६. निविदाधारकाने निविदा सादर करताना.रु.५०० च्या स्टॅम्प पेपरवर कागद पत्रांच्या सत्यतंबावंत सत्यतांपत्र (नोटराईज्ड केलेली) सादर करणे बंधनकारक राहील.

३७. वरील अटी व शर्ती व्यतिरिक्त अन्य कोणत्याही अटी व शर्तीचा समावेश करारनाम्या मध्ये करण्याचा अधिकार मा. आयुक्त मनपा यांना राहील.

३८. निश्चित झालेल्या निविदाधारकाने लिलाव निश्चित झालेनंतर नियंत्रण अधिकारी – मंडई विभाग यांचेशी करारपत्र करतेवेळी सुरक्षित रक्कम म्हणून रक्कम रुपये २०,०००/- भरावयाचे आहे.

३९. सदरच्या जागेत कोणत्याही स्वरुपाचे पक्के बांधकाम करणेस मज्जाव आहे.

४०. अर्ज सादर करतेवेळी अर्जदारास लिलावाची तारीख व वेळ कळविण्यात येईल.

Digitally signed by
Danke Tapan Dilip
Date: 10-10-2025
10:47:22

नियंत्रण अधिकारी
मंडई विभाग
सोलापूर महानगरपालिका